# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.


**क्र.मजीप्रा-२०१८/सभा-१४४/(४८)/आ.४/** **दिनांक : १०.६.२०१९**

**विषय** : दि.५ मार्च, २०१९ रोजी झालेल्या म.जी.प्रा.च्या संचालक मंडळाच्या १४४व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) मजीप्रा, मुंबई.

खाजगी सचिव, मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

**प्रत : माहितीसाठी.**

खाजगी सचिव (मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई. सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

खाजगी सचिव (मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा उपाध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई. सोबतचे इतिवृत्त मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत : माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

अधीक्षक अभियंता, म.नि.सं. व स., सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.

अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) मजीप्रा, मुंबई.

अधीक्षक अभियंता, (यांत्रिकी), ठाणे.

उप मुख्य लेख्याधिकारी (१ / २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

उप अभियंता तथा मालमत्ता व्यवस्थापक (कक्ष -९), मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता, (आय.टी.सेल), सिडको भवन, नवी मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी/कार्यासन अधिकारी (आस्थापना - ५ ) मजीप्रा मुंबई/सि.भ. नवी मुंबई.

**सोबत इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबीवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयात सादर करावा.**

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४४ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १४४ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.बबनराव लोणीकर यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक ५ मार्च, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता त्यांचे शासकीय निवासस्थान बंगला क्र.ब-२ येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य तसेच प्रतिनिधी उपस्थित होते.

१) मा.श्री.बबनराव लोणीकर, मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.सदाभाऊ खोत, राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष,
३) मा.श्री.शामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४) मा.श्री.पी. वेलरासू, सदस्य सचिव, म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.
५) प्रधान सचिव, (उर्जा) उद्योग, उर्जा व कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे प्रतिनिधी श्रीमती. कविता के. तोंडे, क्क्ष अधिकारी, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.वाय.बी.पाटील, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्री.अशोक मांडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.) म.जी.प्रा. मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ : म.जी.प्रा. च्या १४३ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १४३ वी सभा दि.१ नोव्हेंबर, २०१८ रोजी संपन्न झाली. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १४३ व्या सभेच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.२ :** म.जी.प्रा.च्या १४३व्या सभेतील निर्णयाप्रमाणे झालेल्या कार्यवाहीस मान्यता देणे.

म.जी.प्रा. च्या संचालक मंडळाची दि.१ नोव्हेंबर, २०१८ रोजी संपन्न झालेल्या १४३ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १४३ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१५-१६ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१५-१६ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल मा. संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आला. यावर चर्चा होवून म.जी.प्रा.च्या सन २०१५-१६ च्या वार्षिक प्रशासनिक अहवालास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**कार्यक्रम बाब क्र.४ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१६-१७ चा वार्षिक लेखा.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१६-१७ चा वार्षिक लेखा संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आला. वार्षिक लेख्याबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सन २०१६-१७ चा वार्षिक लेख्यास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व खालीलप्रमाणे ठराव पारीत केला.

**ठराव :**

१) ठराव करण्यात येत आहे की, सन २०१६-१७ या वर्षाचे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात येत आहेत.

२) असाही ठराव करण्यात येत आहे की, सन २०१६-१७ चे वार्षिक लेखे प्राधिकरणाच्या वतीने अध्यक्ष व सदस्य सचिव यांनी प्रमाणीत करावेत.

३) तसेच असाही ठराव करण्यात येत आहे की, स्वीकृत लेख्यांमध्ये मांडण्यात आलेल्या कामाच्या निष्कर्षामध्ये ज्याच्यामुळे कोणताही महत्वाचा फरक पडणार नाही, अशा किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या प्राधिकरणाच्या संचालक (वित्त) व सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने करता येतील.

४) स्वीकृत लेखा, महालेखापाल मुंबई यांना लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे इ. साठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र ५ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१८-१९ चे सुधारित अंदाज व सन २०१९-२० चे अर्थसंकल्पीय अंदाज.

सदर प्रस्तावाबाबत सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी संचालक मंडळास अवगत केले. संचालक (वित्त), यांनी संचालक मंडळास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत सविस्तर अवगत केले. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

**ठराव :-**

१) असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचे सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

**रुपये लाखात.**

| अ.क्र. | तपशिल | सन २०१८-१९ चे सुधारित अंदाज | सन २०१९-२० चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १. | महसुली जमा | ७८००२.८८ | ८५५७५.८२ |
| २. | महसुली खर्च | ८५८९१.६६ | ८६४४४.६२ |
| ३. | भांडवली जमा | -- | -- |
| ४. | भांडवली खर्च | -- | -- |

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुमधून भागविण्यात येईल.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सन २०१८-१९ साठी अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतन व भत्तेसाठी रु.१८५.६१ कोटी अनुदानाची मागणी केली आहे. त्यापैकी शासनाकडून रु.१२५.२१ कोटी प्राप्त झाले आहेत. उर्वरीत अनुदान रु.६०.४०कोटी शासनाने मजीप्रास उपलब्ध करुन देण्यास म.जी.प्रा. मार्फत पाणी पुरवठा विभागास मागणी करण्यात आली आहे.

४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सन २०१९-२० साठी रु.१९७.२८कोटी रकमेचे अनुदान नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांसाठी मागितलेले आहे. सदर अनुदान शासनाने म.जी.प्रा.स उपलब्ध करुन देण्यात यावे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

५) वेतना व्यतिरिक्त इतर भत्यांचा मागणीमध्ये समावेश केला नाही. प्रवासभत्ता, वैद्यकीय प्रतिपूर्ती, कार्यालयीन खर्च, वाहन देखभाल खर्च स्टेशनरी व इमारत देखभाल दुरुस्ती इत्यादीसाठी विभागीय कार्यालयाकडून प्रस्तावाव्दारे स्वतंत्रपणे मागणी करण्यात येईल.

६) निवृत्ती वेतनासाठी महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे लेखाशिर्ष क्र.२२१५A०५२ लेखाशिर्षामध्ये तरतूद केली आहे. शासनाने सन २०१८-१९ मध्ये पुरक मागणी रु.२००.०० कोटी मंजूर केले आहेत. शासनाने सन २०१८-१९ साठी रु.२००.०० कोटी व सन २०१९-२० साठी रु.२५०.३१ कोटी अनुदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यात यावे.

७) भांडवली जमा व भांडवली खर्चाच्या प्रस्तावित तरतुदी मुख्यत्वे महाराष्ट्र शासनाच्या अंदाजपत्रकीय तरतुदी शासनाकडून प्राप्त न झाल्यामुळे त्या तरतुदी अपेक्षित अनुदानाच्या मर्यादेत घेण्यात याव्यात. शासनाच्या अंतिम अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार अपेक्षित अनुदान रकमेत काही फरक/बदल झाल्यास त्याप्रमाणे सन २०१८-१९ च्या सुधारित व सन २०१९-२० च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंदाजपत्रकात बदल होईल.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र६.** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची वेणा पाणी पुरवठा केंद्र योजना जि. नागपूर, टंचाई परिस्थिती विचारात घेऊन आकस्मिक पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी करणेबाबत.

सदर प्रस्तावाबाबत कार्यक्रम बाबीनुसार सदस्य सचिव मजीप्रा यांनी संचालक मंडळास अवगत केले. मजीप्राच्या मालकीच्या वेणा पाणी पुरवठा केंद्र योजनेसाठी सन २०१९ च्या उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाई विचारात घेऊन नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील अंबाझरी तलाव उद्भव घेऊन टंचाई पाणी पुरवठा योजनेसाठी रु ९३१.७६.लक्ष इतक्या निधीची आवश्यकता असून सदर निधी या योजनेचे मुख्य ग्राहक असलेल्या आयुध निर्माणी (ऑर्डीनन्स फॅक्टरी), अंबाझरी यांच्यामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने सदर योजनेचे काम पुर्ण ठेव तत्वावर करण्याबाबतच्या प्रस्तावाची माहिती अवलोकनार्थ संचालक मंडळासमोर सादर करण्यात आलेली आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

या विषयी पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

वेणा पाणी पुरवठा योजने अंतर्गत आयुध निर्माणी अंबाझरी ही राष्ट्राच्या सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशिल व महत्वाची केंद्र शासनाची संस्था असल्याने तेथील पाणी पुरवठा अखंडीत ठेवणे आवश्यक आहे. सन २०१९ मधील संभाव्य पाणी टंचाईवर मात करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या अंबाझरी तलावातून पाणी उचल करुन वरीलप्रमाणे आकस्मिक पाणी पुरवठा योजना तातडीने राबविणे आवश्यक आहे.

सदर आकस्मिक पाणी पुरवठा योजनेसाठी रु.९३१.७६ लक्ष इतका खर्च, अपेक्षित असून आवश्यक निधी आयुध निर्माणी (Ordinance Factory), अंबाझरी यांचेकडून उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे योजनेचे काम पूर्ण ठेव तत्वावर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७ :** महाराष्ट्र जीवन प्राधिसकरणाच्या नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये असलेल्या सोसायट्या/ इमारती/ संकुले यांना वाढीव नळ जोडणीकरीता आकारावयाचे भांडवली अंशदान बंद करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत मा. सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले की, अंबरनाथ व बदलापूर शहरांतर्गत विकासकांमार्फत निवासी इमारती बांधून पूर्ण झाल्यानंतर, सदनिका धारकांची गृहनिर्माण संस्था तयार करुन, या गृहनिर्माण संस्थेस सोसायटीमधील सदनिकाधारकांकडे सदर निवासी इमारतीचे/इमारतींचे हस्तांतरण करण्यात येते. तथापि, विकासकांकडे सदर निवासी इमारतींकरीता आवश्यक असणाऱ्या नळजोडण्यांची संख्या मंजूर करुन घेत नाहीत. त्यामुळे भविष्यात सदर गृहनिर्माण संस्थाना नळजोडण्यांची संख्या कमी असल्यामुळे पाणी टंचाईस सामोरे जावे लागते. पर्यायाने नळजोडण्यांची संख्या कमी असल्यामुळे अपुरा पाणी पुरवठा होऊन, गृहनिर्माण संस्थेतील सदनिकाधारक म.जी.प्रा. च्या कार्यालयावर मोर्चे काढतात. त्यामुळे सदर मोर्चे घेऊन आलेल्या गृहनिर्माण संस्थांना आवश्यकतेनुसार वाढीव नळजोडण्या घेणेबाबत तसेच वाढीव नळ जोडण्यांकरीता म.जी.प्रा. च्या प्रचलित धोरणानुसार भांडवली अंशदान भरणा करण्याबाबत सूचित करण्यात येते. तथापि, गृहनिर्माण संस्थाची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे म.जी.प्रा. च्या प्रचलित धोरणानुसार भांडवली अंशदान भरण्यास या गृहनिर्माण संस्था तयार होत नाही. परिणामी सदर गृहनिर्माण संस्था अनधिकृतपणे वाढीव नळजोडण्या घेत असून, त्यामुळे हिशोबबाह्य पाण्याच्या परिमाणात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन मजीप्राच्या महसुलात घट होत आहे.

अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

त्यानुसार या बाबी गृहसंकेले/ गृहनिर्माण संस्था/ इमारती/ निवासी संकुले/ विकासक यांचेकडून नवीन नळजोडणी किंवा वाढीव नळजोडणीकरीता मागणी आल्यास नळजोडणीकरीता भरावयाचे भांडवली अंशदान प्राप्त करुन न घेता, नळजोडणी देण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देणे तसेच यापूर्वी प्राप्त करुन घेण्यात आलेले भांडवली अंशदान कोणत्याही विकासकास परत न करता, ज्या दिनांकास म.जी.प्रा. मार्फत परिपत्रक निर्गमित करण्यात येईल त्या दिनांकापासून परिपत्रक लागू करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव संचालक मंडळासमोर सादर करण्यात आला.

सदर प्रकरणी राज्यातील इतर पाणी पुरवठा केंद्राचा अभ्यास करुन नव्याने प्रस्ताव संचालक मंडळासमोर सादर करणे बाबतचे निर्देश अध्यक्ष, म.जी.प्रा. यांनी दिले.

**कार्यक्रम बाब क्र.८:** बीड येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या विभागीय व उप विभागीय कार्यालयाची इमारत बांधकाम करणेबाबत.

सदर प्रस्तावाबाबत सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी संचालक मंडळास अवगत केले की, म.जी.प्रा.चे बीड येथील विभागीय कार्यालय अंतर्गत १) उप विभाग, आंबाजोगाई २) उप विभाग, बीड ३) उप विभाग क्र.२ बीड असे तीन उप विभाग कार्यालये आहेत. मध्यवर्ती कार्यालयाचे पत्र क्र. आस्था.६, दि.६.१.२०१९ अन्वये म.जी.प्रा. उप विभाग माजलगाव हे कार्यालय तात्पूरत्या स्वरुपात म.जी.प्रा. विभाग, बीड अंतर्गत उप विभाग क्र.२ म्हणुन स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. म.जी.प्रा. बीड विभागीय कार्यालय भाड्याने घेतलेल्या इमारतीमध्ये आहे. सदर भाड्याच्या इमारतीच्या तळमजल्यावर उप विभाग क्र.२, बीड कार्यरत आहे.

म.जी.प्रा. बीड विभागांतर्गत सद्यस्थितीत बीड शहर पाणी पुरवठा योजना, बीड भूयारी गटार योजना (दोन्ही अमृत योजनेअंतर्गत) सुरु आहेत. तसेच पूर्ण ठेव तत्वावर तांत्रिक सल्लागार म्हणून बरेच कामे सुरु आहेत. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल अंतर्गत पट्टी वडगाव ९ गावे व पुस व २० खेडा या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनर्जीवन करणे हे काम मंजूर झालेले आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत चिंचोली माळी व गावे या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मंजूरी प्राप्त झालेली आहे.

बीड येथे म.जी.प्रा.च्या मालकीची व ताब्यात असलेल्या जागेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | ठिकाण | क्षेत्रफळ (चौ.मी.) | ७/१२ प्रमाणे नोंद |
|---|---|---|---|---|
| १ | ३० | तेलगांव पिंपळनेर रोड, बीड (बीड शहरांतर्गत) | ८६०० | कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा, बीड दिनांक.३०.०३.१९९९ अन्वये फेरफार नोंद. |
| २ | ५६ | औरंगाबाद सोलापूर रोडवर मौजे घोसापूरी | २०००० | म.जी.प्रा. बांधकाम विभाग, बीड ८-अ उताऱ्यावर नोंद दि. ०२.०३.२०१६ |

प्रस्तावित विभागीय कार्यालय व उप विभागीय कार्यालय इमारतीचे बांधकाम आराखडे व अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत. त्यानुसार बांधकामाचे क्षेत्रफळ व अंदाजपत्रक रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | ठिकाण | क्षेत्रफळ (चौ. मी.)चटईक्षेत्र | अंदाजपत्रक रक्कम (लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | विभागीय कार्यालय व उप विभाग क्र.२, बीड | तेलगांव पिंपळनेर रोड, बीड (बीडं शहरांतर्गत) | ६७०.८१ | २४२.३७ |
| २ | उप विभाग, बीड | औरंगाबाद सोलापूर रोडवर मौजे घोसापूरी | २०६.१६ | ७४.४८ |
| | | **एकूण** | **८८६.९७** | **३१६.८५** |

त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्याची विनंती आहे.

**ठराव:**

असा ठराव करण्यात येतो की, म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून बीड येथील तेलगांव पिंपळनेर रोड, या ठिकाणी म.जी.प्रा. विभागीय कार्यालय, बीड, म.जी.प्रा. उप विभाग क्र.२, बीड व म.जी.प्रा. उप विभाग, बीड या कार्यालयांकरीता सुसज्ज इमारत बांधणे व याकरिता अनुभवी व नामांकित वास्तुविशारद नेमण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. या कार्यवाहीकरीता मा.सदस्य सचिव, मुंबई यांना प्राधिकृत करणेत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ९ :** मा.अध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे कार्यालयासाठी नवीन वाहन खरेदी करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले की, सध्या मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे सध्या वापरात असलेले टोयाटो कंपनीचे डिझेलवर चालणारे वाहन क्र.एमएच-०४/एएच-३५३५ हे वाहन सन २०१० मध्ये खरेदी केले असून ९

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

वर्षे जुने झालेले आहे. वाहनाचा वापर मोठ्या प्रमाणात असल्याने त्यावर होणारा इंधन व देखभाल दुरुस्तीचा खर्च मोठ्या प्रमाणात आहे. सदरचे वाहन शासनाच्या काटकसरीच्या धोरणानुसार यापुढे वापरात ठेवणे आर्थिकदृट्या परवडणारे नसल्याने सदरचे वाहन निर्लेखित/ हस्तांतरीत करुन, त्या ठिकाणी एक नवीन वाहन खरेदी कल्यास इंधन व देखभाल दुरुस्तीच्या खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होईल.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम दि.२१.१.२०१७ च्या शासन निर्णयानुसार मा.मंत्री यांचे कार्यालयीन कामाकरीता रु.२०.०० लक्ष किंमतीच्या मर्यादेपर्यत त्यांच्या पसंतीचे वाहन खरेदी करण्यास अटी आणि तरतूदींच्या अधीन राहून नवीन वाहन खरेदी करण्यास अनुमती आहे. त्यानुसार मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना नवीन वाहन खरेदी करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने सदर प्रस्तावास मा. संचालक मंडळाची मान्यता घेण्याचे प्रस्तावित आहे. नवीन वाहन खरेदी केलेले असल्याने जुन्या वाहनाबाबत नियमानुसार निर्लेखन/हस्तांतरण करणेची कार्यवाही करण्यात येईल.

सदरच्या कार्यक्रम बाबीवर झालेल्या चर्चा दरम्यान अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या कार्यालयीन कामासाठी महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय दि.२१.१.२०१७ मधील तरतूदीनुसार रु.१२.०० लक्ष किंमतीच्या मर्यादेपर्यत त्यांच्या पसंतीचे वाहन खरेदी करण्याबाबत चर्चा झाली. सदर चर्चेनंतर खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव :**

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना शासन निर्णय क्र. वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम दि.२१.१.२०१७ मध्ये नमूद आर्थिक मर्यादेत कार्यालयीन वापराकरिता एक नवीन वाहन खरेदी केलेले आहे. सदर कार्यवाहीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

त्याचप्रमाणे अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या कार्यालयीन कामासाठी महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय दि.२१.१.२०१७ मधील तरतूदीनुसार रु.१२.०० लक्ष किंमतीच्या मर्यादेपर्यत त्यांच्या पसंतीचे वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १० :** म.जी.प्रा.च्या मध्यवर्ती कार्यालयात रिक्त असलेली सहाय्यक लेखाधिकारी/ वरिष्ठ लिपीक ही पदे तसेच म.जी.प्रा. च्या आस्थापनेवरील विविध विभागात "विभागीय लेखापाल" ही पदे म.जी.प्रा. मधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यामधून करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी भरणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील गट"क" व गट "ड"मधील पद भरती सन २००० पर्यंतच करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन,वित्त विभाग,शासन परीपत्रक दिनांक १ मार्च २००० अन्वये राज्य शासनाने पद भरतीवर बंदी घातली आहे.सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आदेश दिनांक ८ मार्च २००० अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पद भरतीवर निर्बंध लागू केले आहेत व प्राधिकरणाचे परीपत्रक दिनांक १०.०७.२०१५ अन्वये सदर पद भरतीवरील निर्बंध यापुढेही कायम ठेवणेत आले आहेत.

प्राधिकरणातील गट"क" मधील काही संवर्ग रिक्त पदांचे प्रमाण ५० टक्केपेक्षा जास्त आहे. उक्त शासन निर्णयान्वये पदांची भरती प्रकिया बंद आहे.त्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सध्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यापैकी नियत वयोमाना नुसार पुढील दोन वर्षात ४०टक्के कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सद्य:स्थितीत गट"क" मधील रिक्त पदांमुळे कार्यालयीन काम करणे फारच जिकरीचे होत आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क.१००/ १३/दिनांक १७.१२.२०१६ अन्वये केवळ गट"अ" व गट"ब" (राजपत्रित व अराजपत्रित) या संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिका-यांना करार पध्दतीने नियूक्ती देण्याची तरतूद आहे.सदर शासन निर्णयामध्ये करार पध्दतीने द्यावयाच्या नियुक्तीसाठी "क" संवर्गातील कर्मचा-यांना वगळण्यात आले आहे.परंतु प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयातील विशिष्ट कामकाजासाठी बाह्ययंत्रणेव्दारे प्राप्त अननुभवी कर्मचारी उपयुक्त ठरण्याची शक्यता कमी असल्याने सहाय्यक लेखाधिकारी /वरिष्ठ लिपीक तसेच क्षेत्रीय स्तरावरील विभागीय लेखापाल या संवर्गामध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमधून करारपध्दतीने नियुक्ती करणे आवश्यक आहे.

यापुर्वी म.जी.प्रा.मध्ये रिक्त असलेली पदे म.जी.प्रा.मधून पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यामधून भरणेबाबत संचालक मंडळाच्या २७ मार्च २०१८ रोजीच्या १४१ व्या बैठकीमध्ये कार्यक्रम बाब क्र.९ अन्वये मान्यता देणेत आलेली आहेत. त्यानुसार शासन

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क.१००/१३ दि. १७.१२.२०१६ मधील तरतूदीनुसर करार पध्दतीने पदे भरणेत आलेली आहेत.

याबाबी विचारात घेवून म.जी.प्रा.मध्यवर्ती कार्यालयात रिक्त असलेली सहाय्यक लेखाधिकारी/वरीष्ठ लिपीक ही पदे तसेच म.जी.प्रा.च्या आस्थापनेवर विविध विभागात रिक्त असलेली "विभागीय लेखापाल" ही पदे करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी म.जी.प्रा.कर्मचा-यामधून त्या त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्या मधून शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:संकीर्ण-२७१५/ प्र.क.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६ व शासन निर्णय दिनांक ११.१२.२०१८ मधील निर्देशानुसार मान्यता देणे तसेच शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ मधील परीशिष्ट "अ" नुसार मासिक पारिश्रमिकाची व भत्त्याची परीगणना करणेस मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव संचालक मंडळासमोर मान्यतेस्तव सादर करण्यात आला.

त्या अनुषंगाने खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव:**

असा ठराव करणेत येतो कि, म.जी.प्रा.मध्यवर्ती कार्यालयात रिक्त असलेली "सहाय्यक लेखाधिकारी/वरीष्ठ लिपीक" ही पदे तसेच म.जी.प्रा.च्या आस्थापनेवर विविध विभागात रिक्त असलेली/ रिक्त होणारी "विभागीय लेखापाल" ही पदे करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी म.जी.प्रा.कर्मचा-यामधून त्या त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-या मधून भरणेसाठी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:संकीर्ण-२७१५/ प्र.क.१००/ १३ दिनांक १७.१२.२०१६ व शासन निर्णय दिनांक ११.१२.२०१८ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. त्यापुढील कार्यवाही सदस्य सचिव हे सक्षम राहतील.

**कार्यक्रम बाब क्र.११ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ६ प्रादेशिक विभागात सनियंत्रण व मुल्यमापन कक्षामध्ये (Monitoring/Evaluation Cell) वाढीव **सहाय्यक सनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ** (Assistant Monitoring & Evaluation Specialist) **नेमण्याबाबत**.

सदर प्रस्तावाबाबत कार्यक्रम बाबीनुसार, सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले, मध्यवर्ती नियोजन, संकल्पचित्र व सनियंत्रण कक्षाकडे सद्य:स्थितीत केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत योजनेचे सनियंत्रण विविध कार्यक्रमांतर्गत नागरी पाणी पुरवठा योजनांची तपासणी, घणकचरा व्यवस्थापन स्वच्छता अभियानांतर्गत, मुख्यमंत्री

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

ग्रामीण पेयजल कार्यकमांतर्गत तसेच जलस्वराज्य-२ अभियांनांतर्गत योजनेचे सनियंत्रण, राज्यस्तरीय तांत्रिक समिती तसेच इतर योजनांच्या आढावा बैठकीपोटी पीपीटी सादरीकरण इ. विविध क्षेत्रीय कार्यालयाकडून ई मेलव्दारे/दूरध्वनीव्दारे माहिती संकलन करणे, इ. कार्यभार आहे.

दि. १ नोव्हेंबर, २०१८ रोजी मा. संचालक मंडळाच्या १४३व्या बैठकीत कार्यक्रम बाब क्र.५ अन्वये मध्यवर्ती नियोजन, संकल्पचित्र व संनियत्रण कक्षामध्ये सनियंत्रण व मुल्यमापन कक्ष (Monitoring & Evaluatin Cell ) स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे सदर कक्षामध्ये १ सनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ आणि २ सहाय्यक सनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ यांची २ वर्षासाठी बाह्ययंत्रणेव्दारे (Outsourcing) नेमणूक करण्यास मान्यता दिली आहे.

म.जी.प्रा.च्या ६ प्रादेशिक विभागामार्फत वरील नमुद कामे त्यांच्या अधिपत्याखालील विभाग तसेच उप विभागाकडून माहीती संकलन व मुल्यमापन करुन मध्यवर्ती कार्यालयास सादर करावी लागतात. या कामासाठी व माहीती एकसुत्रता रहावी या करिता ६ प्रादेशिक विभागामध्ये सनियंत्रण व मुल्यमापन कक्षं (Monitoring & Evaluatin Cell ) स्थापन करणे आवश्यक आहे.

सदर कामकाज सुरळीत पणे पार पाडून विविध योजनांची माहिती शासन स्तरावरील विविध बैठकींत सक्षमपणे सादर करण्यासाठी म.जी.प्रा.च्या ६ प्रादेशिक विभागामध्ये सनियंत्रण व मुल्यमापन कक्ष (Monitoring & Evaluatin Cell ) स्थापन करण्यासाठी ६ सहाय्यक सनियंत्रण व मुल्यमापक तज्ञांची २ वर्षासाठी करार पध्दतीने नियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

त्याधर्तीवर खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

१. म.जी.प्रा.च्या ६ प्रादेशिक विभागासाठी सनियंत्रण व मुल्यमापन कक्ष (Monitoring & Evaluatin Cell ) स्थापन करण्यास कार्येत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२. म.जी.प्रा. च्या प्रत्येक प्रादेशिक विभागाच्या सनियंत्रण व मुल्यमापन (Monitoring & Evaluatin ) कक्षामध्ये सहाय्यक सनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ (Assistant Monitoring & Evaluation Secialist) यांची २ वर्षासाठी बाह्य यंत्रणेव्दारे (Out sourcing) नेमणूक करण्यास व त्याबाबतचे केलेल्या निविदा प्रक्रियेस कार्येत्तर मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

३. सहाय्यक सनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या, शैक्षणीक अर्हता व अनुभव तसेच वेतन वगळता इतर सेवा शर्ती इ. कार्यक्रम बाबीसोबतच्या Ammexire A मध्ये नमुद केल्याप्रमाणे तसेच शासन निर्णय क्र.जस्वप्र०११४/ प्र.क्र.०५/पापु-११/ दि.६.२.२०१४ मधील तरतुदींच्या धर्तीवर ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१२ :** नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीस स्थगीती देणेबाबत.

सदर प्रस्तावाबाबत सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी संचालक मंडळास अवगत केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे महानगरपालिका/नगरपालिकेकडून वेळेवर कर्जाची परतफेड होत नसल्याने मजीप्राने आयुर्विमा महामंडळास कर्जफेडीपोटी अदा करावयाची देय रक्कम (मजीप्रा हिस्सा + मनपा/न.पा. प्राप्त रक्कम) प्रदान करण्यास स्थगित केलेले आहे. शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे आयुर्विमा महामंडळाची थकीत रक्कम एकरकमी अदा करण्यासंदर्भात (OTS) प्रस्ताव आयुर्विमा महामंडळास सादर केला असून त्याबाबतची कार्यवाही म.जी.प्रा.च्या व शासनाच्या स्तरावर चालू केलेली आहे.

याबाबत संचालक मंडळास अवगत करण्यात आले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव मंजर करण्यात येत आहे.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, आयुर्विमा महामंडळाला म.जी.प्रा. कडून येणे थकित असल्याने "पूर्ण देय रक्कम वेळेवर परतफेड होत नसल्याने काही प्रमाणात जमा करण्यात येत असलेली रक्कम, प्रथम व्याजापोटी समायोजीत करत असल्याने, म.जी.प्रा. संचालक मंडळ दि.१.६.२०१८ दि.१..२०१८ व दि.१.१२.२०१८ ची कर्जपरतफेडी पोटी आयुर्विमा महामंडळास अदा करावयाची अनुज्ञेय रक्कम पुढील (OTS) प्रस्ताव मान्य होईपर्यत स्थगित ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत कार्यवाही करण्यासाठीं सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

कार्यक्रम बाब क्र.१३: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/करणेअस्विकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणेबाबत.

मजीप्राच्या निविदा समितीने घेतलेल्या निर्णयाबाबत संचालक मंडळास अवगत करुन शिक्कामोर्तब करुन घेण्याविषयीच्या सूचना असल्याने, निविदा समितीच्या ९८ व्या बैठकीपासून ११७ व्या बैठकीपर्यत निविदा समितीत घेतलेल्या स्वीकृत /अस्विकृतीच्या निर्णयाबाबत कार्यक्रम बाबीनुसार सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी संचालक मंडळास अवगत केले.

याविषयी पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, मजीप्राच्या निविदा समितीच्या ९८व्या बैठकीपासून ११७व्या बैठकीपर्यत निविदा समितीत घेतलेल्या स्वीकृत / अस्विकृतीच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात येत असून, मजीप्राच्या निविदा समितीच्या ९८व्या बैठकीपासून ११७व्या बैठकीपर्यत घेतलेल्या सर्व निर्णयांना मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१४ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नागपूर येथील विश्रामगृहाजवळ नवीन विश्रामग्रह कांधकाम करणेबाबतच्या कार्यक्रम बाबीस मंजूरी देणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत मा.सदस्य सचिव यांनी मा. संचालक मंडळास अवगत केले की, मौजे तेलंगखेडी, फुटाला तलावाजवळ, वायुसेना रोड, नागपूर, खसरा क्र.२३/१ या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात असलेल्या जागेवर नवीन विश्रामगृह बांधकामास मंजूरी देण्याची बाब विचाराधीन आहे.

जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालयीन आदेश क्र.१४०/६७/नझूल दि.१८.८.१९६८ अन्वये आयुध निर्माणी अंबाझरी, नागपूरला पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने बुस्टर पंप स्टेशनसाठी मजीप्रास खसरा क्र.२३/१ मौजे तेलंगखेडी, फुटाला तलावाजवळ, वायुसेना रोड येथील जागा उपलब्ध करुन देण्यात असल्याचे या कार्यालयातील मजीप्रा ज.व्य.विभाग, नागपूर कार्यालयात उपलब्ध दस्तऐवजावरुन दिसून येते. असे मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी दि.२६.२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सदर जागेत आयुध निर्माणी अंबाझरी नागपूरला पाणी पुरवठा करण्यासाठी बुस्टरपंप स्टेशनची तसेच तेथे कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी दोन कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम करण्यात आले होते.

सदर जागेतच अंदाजे सन १९९७-९८ मध्ये अतिथीगृहाचे बांधकाम करण्यात आले. सदर अतिथीगृहात तळमजळयावर एक व्ही.आय.पी. सुट व एक वातानाकुलीत खोली असून प्रथम माळयावर दोन व्ही.आय.पी. सुट व 3 वातानुकुलीत खोल्या उपलब्ध आहेत.

सदर ठिकाणी एकूण ४००६ चौ.मी. जागा उपलब्ध आहे. त्या जागेवरील सद्यस्थीतीतील बांधकामाचे अंदाजे क्षेत्रफळ २६० चौ.मी. इतके आहे. महाराष्ट्र विधान मंडळाचे हिवाळी अधिवेशन दरवर्षी नागपूर येथे होत असते. सदर अधिवेशनाचे कामकाजासाठी मुंबई व इतर ठिकाणावरुन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी येत असतात. सदर अधिवेशन काळात येणाऱ्या अधिकाऱ्यासाठी अस्तित्वातील अतिथीगृह अपुरे पडत असल्यामुळे त्यांच्या निवासाची व्यवस्था होत नसल्यामुळे त्यांची व्यवस्था इतरत्र करावी लागते. त्यामुळे काही वेळेस निवास व्यवस्थेची समस्या निर्माण होते. यावर उपाय म्हणून सदर जागेत पुन:श्च एक नवीन अतिथीगृहाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर जागेवर अस्तीत्वातील बुस्टर पंप स्टेशन सध्या कार्यरत नसून त्याची भविष्यात आवश्यकता नाही. तसेच अस्तित्वातील कर्मचारी निवासस्थान मोडकळीस आल्यामूळे ते पाडून त्याजागी नवीन अतिथी गृहाचे बांधकाम करणे शक्य आहे.

सदर जागेवरील नवीन बांधकामाचा नकाशा सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, नागपूर महानगर पालिका यांचे पत्र क्र.२२९६ व २२९७ दि.२२.२.२०१९ अन्वये पत्रान्वये रु.८८५५/- व वृक्ष संवर्धन शुल्क रु.१४५००/- भरण्याच्या अटीवर मंजूरी देण्यात आलेली आहे. प्राधिकरणाने सदर रक्कम दि.२६.२.२०१९ रोजी नागपूर महानगरपालिकेकडे जमा केलेली आहे.

नवीन अतिथीगृहाचे बांधकाम खालील प्रमाणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | मजला | नियोजीत वापर | प्रस्तावित बिल्टअप क्षेत्र. Builtup Area Sq.Mt. |
|---|---|---|---|
| १. | तळमजला | स्वयपाकगृह, स्टोअर, भोजनकक्ष, कर्मचारी कक्ष, प्रतिक्षालय, कार्यालय, स्वच्छता गृह, लिफ्ट व लॉबी. | ४०५.८६४ |
| २. | पहिला मजला व दुसरा मजला. | प्रत्येकी सहा सुटस्, टीव्ही रुम, व कार्यालय. | प्रत्येक मजला ३८७.३९३ X २ = ७७४.७८६ |
| | | **एकूण** | ११८०.६५ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्रस्तावित नवीन अतिथीगृहाच्या बांधकामासाठी ४२७.६७ लक्ष खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च मजीप्राच्या स्वनिधीतून भागविण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नागपूर कार्यालयाचे पत्र क्र.४४१ दि.२२.२.२०१९ अन्वये तांत्रिक मंजूरी देण्यात आलेली आहे.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र विधान मंडळाचे हिवाळी वार्षिक अधिवेशन नागपूर येथे दरवर्षी होत असते. सदर अधिवेशनाचे कामकाजासाठी मुंबई व इतर ठिकाणावरुन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अधिकारी/कर्मचारी येत असतात. सदर अधिवेशन काळात येणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी अस्तित्वातील नागपूर येथील अतिथीगृह अपुरे पडत असल्यामुळे व निवासाची व्यवस्था होत नसल्याने शासनाने प्राधिकरणास उपलब्ध करुन दिलेल्या जागेत नवीन अतिथीगृह बांधणे आवश्यक आहे, त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून मौजे तेलंगखेडी, फुटाला तलावाजवळ, वायुसेना रोड, नागपूर, खसरा क्र.२३/१ या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात असलेल्या जागेवर नवीन अतिथीगृह बांधकाम करणे व इतर अनुषंगीक कामासाठी मान्यता देण्यात येत आहे.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र१५. :** मजीप्रामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या कामांची मोजमापे नोंदविणे व देयके अदा करणे यासाठी ऑनलाईन पध्दतीची कार्यप्रणाली विकसित करणेबाबत.

सदर प्रस्तावाबाबत सदस्य सचिव, मजीप्रा यांनी कार्यक्रम बाबीनुसार संचालक मंडळास अवगत केले.

सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभाग या विभागांनी ऑनलाईन पध्दतीची कार्यप्रणाली विकसित केली आहे त्या धर्तीवर मजीप्रामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या विविध कामांची मोजमापे नोंदविणे व देयके अदा करणे यासाठी ऑनलाईन पध्दतीची कार्यप्रणाली विकसित करणे आवश्यक आहे .

विषयांकित कामासाठी निविदा प्रक्रिया करण्यात आली असून निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे. सदर कामासाठी एकूण ५ देकार प्राप्म झाले होते. त्यापैकी तांत्रिक निकषांनुसार पात्र ठरलेल्या ३ निविदाकारांचे देकार दि.२९.१०.२०१८ रोजी उघडण्यात आले असून, त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| अ . क्र. | एजन्सीचे नाव | देकाराची रक्कम रुपये (१८% GST सह) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.चाईस कंन्सल्टन्सी प्रा.लि. अंधेरी | १,६९,७४,५००/- | न्यूनतम क्र१. |
| २ | मे.रेक्सावेअर सोल्युशन्स प्रा.लि. पुणे | २,७१,४०,०००/ | न्यूनतम क्र२. |
| ३ | मे.विदर्भ इन्फोटेक प्रा.लि. नागपूर. | ८,७७,००,०००/- | न्यूनतम क्र३. |

मे.चाईस कन्सल्टन्सी प्रा.लि. अंधेरी यांचा देकार सर्वात कमी असल्याचे आढळून आले आहे. तथापी सदर निविदाकारांने सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याचे आढळून आल्याने, वित्त शाखेच्या अभिप्रायानुसार L-१ चा देकार रद्द कराव L-२ ठेकेदार निविदा ग्राह्यता कालावधी वाढविण्यास तयार असल्यास त्याचा देकाराचा विचार करावा, असे निश्चित करण्यात आले. या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१. मे.चाईस कन्सल्टन्सी प्रा.लि. अंधेरी यांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये तफावत आढळून येत असल्यामुळे त्यांना त्याबाबत खुलासा सादर करण्यायी संधी देऊनही त्यांनी पूर्तता केली नसल्यामुळे त्यांचा देकार अपात्र ठरवले असल्याबाबत व इसारा रक्कम जप्त करण्यात येत असल्याबाबत संबंधित एजन्सीला लेखी स्वरुपात कळविणेत आले आहे.

२. मे.चाईस कंन्सल्टन्सी प्रा.लि., अंधेरी यांनी खोटी कागदपत्रे सादर करुन शासनाची फसवणूक केली असून त्यासाठी त्यांच्यावर फौजदारी कार्यवाही का करु नये तसेच काळ्या यादीत टाकण्याबाबत कार्यवाही का करु नये अशी नोटीस बजावण्यात आली आहे.

३. मे.रेक्सावेअर सोल्युशन्स प्रा.लि., पुणे या L-२ ठेकेदारास निविदा ग्राह्यता कालावधी वाढविण्यास तयार आहे किंवा कसे याबाबत विचारणा करणेत आली. तसेच सदर ठेकेदारास देकार कमी करण्याबाबत विनंती/ वाटाघाटी करणेबात कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने एजन्सीने त्यांचा देकार रु.१.४० लक्षाने कमी करुन रु.२.७० कोटी असा केला आहे.

या कामासाठीचा खर्च मजीप्राच्या स्वत:च्या निधीमधून करण्यास परवानगी मिळण्यास, मे.रेक्सावेअर सोल्युशन्स प्रा.लि., पुणे या L-2 या ठेकेदाराने सादर केलेला रु.२,२८,८१,३५६/- अधिक रु४१,१८,६४४./- GST असा एकूण रु२,७०,००,००.०/- इत्यक्या रकमेचा देकार स्वीकारण्यास अनुमती देण्याविषयी तसेच जलस्वराज्य-२ कार्यक्रमामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रासाठी M&E System चे बळकटीकरण करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली असल्याने, तरी या संदर्भात तपासणी करुन पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेकडून सुध्दा सपोर्ट फंडामधून निधी उपलब्ध होणे शक्य असल्यास

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

निधी प्राप्त करुन घेण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याविषयी मा. संचालक मंडळास विनंती करण्यात आली.

अनुषंगाने संचालक मंडळाच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करणेत आला आहे .

**ठराव :**

सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग यांच्या धर्तीवर विविध योजनांची अंदाजपत्रके तयार करणे मोजमाप पुस्तके नोंदविणे व देयके अदा करणे यासाठी ऑनलाईन , पध्दतीची कार्यप्रणाली मजीप्रासाठी विकसित करणे आवश्यक असून त्यासाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. या कामासाठीचा खर्च मजीप्राच्या स्वत:च्या निधीमधून करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

तथापि, जलस्वराज्य-२ कार्यक्रमामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रासाठी M&E System चे बळकटीकरण करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे, तसेच पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेकडून सुध्दा सपोर्ट फंडामधून निधी उपलब्ध होऊ शकतो. तरी या संदर्भात तपासणी करुन शक्य असल्यास निधी प्राप्त करुन घ्यावा.

२. मे. रेक्सावेअर सोल्युशन्स प्रा.लि. या L-२ ठेकेदाराने सादर केलाला रु.२,२८,८१,३५६/- अधिक रु -/४१,१८,६४४.GST असा एकूण रु२,७०,००,०.००/- इतक्या रकमेचा देकार स्वीकारण्यास अनुमती देण्यात येत आहे.

३. जलस्वराज्य-२ कार्यक्रमामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रासाठी M&E System चे बळकटीकरण करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे, तसेच पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेकडून सुध्दा सपोर्ट फंडामधून निधी उपलब्ध होऊ शकतो. तरी या संदर्भात तपासणी करुन शक्य असल्यास निधी प्राप्त करुन घ्यावा.

४. प्रस्तावित कामासंबंधी आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिव मजीप्रा . यांना देण्यात येत आहेत.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, (दक्षिण कक्ष) बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७, २७५७८४०९
फॅक्स : २७५७ ०१६९, २७५७ १६६६.
वेबसाईट : mjp.gov.in


क्र.मजीप्रा-२०१८/सभा-१४४/(४८)/आ.४/ दिनांक : १० .६.२०१९

प्रति,

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दि.५ मार्च, २०१९ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४४व्या बैठकीचे इतिवृत्त.

**महोदय,**

दि.५ मार्च, २०१९ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४४व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

**आपला विश्वासू,**

**(अशोक मांडे)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.)**